REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख १६ नोव्हेंबर, १९३८ अंक ४५

**सर्वांगीण प्रगति**
सन १९३७ मकम भरभराटीचें वर्ष

## वेस्टर्न इंडिया

**लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड**
सातारा शहर

१९३८ अखेर
*आठवें मूल्यमापन*
आणि
रौप्य महोत्सव

**त्रैवार्षिक बोनस**
हयातीनंतर रु. ७५ आणि हयातींतील रु. ६०
*कोणत्याही दृष्टीनें पहा*
वेस्टर्न इंडिया ठसठशीतपणें डोळ्यांत भरेल.
पुणें शाखा : : लक्ष्मी रोड, पुणें.

स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी

**लिमिटेड, पुणें.**

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंट.

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

# विविध माहिती

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ५ आ. १० प व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २½ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शें. १ रु. ५ आ. १० पै इतका पडला.

### हिंदी कॉफीचा ग्रेट ब्रिटनमध्यें प्रचार

हिंदी कॉफीचा ग्रेट ब्रिटनमध्यें येत्या वर्षी प्रचार करण्याकरितां इंडियन कॉफी सेस कमिटीनें ५४ हजार रुपये मंजूर केले आहेत.

### माजी जर्मन कसैर

माजी जर्मन कैसर गेलीं वीस वर्षे हॉलंडमध्यें जाऊन राहिले आहेत. २७ जानेवारी, १९३९ रोजीं त्यांच्या वयास ८० वर्षे पुरीं होतात. त्यांची शरीरप्रकृति अजून सुदृढ आहे.

### शिंया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि.

वरील कंपनीस गेल्या वर्षी १६½ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागावर करमाफ १ रुपया डिव्हिडंड मिळालें.

### सरकीच्या वहातुकीचे दरांत सवलत

सरकीच्या वहातुकीचे दर जी. आय. पी. रेल्वेनें १५% ते २०% उतरविले असल्याचें जाहीर केलें आहे. ३० जून १९३९ अखेर हे सवलतीचे दर अंमलांत रहातील.

### टारिफ बोर्डाची नेमणूक तहकूब !

हिंदी कपास-कापडाच्या उत्पादनास दिलेल्या संरक्षणाची मुदत ३१ मार्च, १९३९ अखेर संपते. हें संरक्षण चालू ठेवण्यासंबंधीं चौकशी करण्यासाठीं टारिफ बोर्ड नेमण्याचें, हिंद-ब्रिटन व्यापारी कराराचा मसुदा दोन्ही देशांस संमत होईपर्यंत, हिंदुस्थान सरकारनें तहकूब केलें आहे असें समजतें.

### म्हैसूर संस्थानांत विजेचें उत्पादन

म्हैसूर संस्थानांत १९३७-३८ मध्यें एकूण २३ कोटि, ८६ लक्ष यूनिट्स विजेचें उत्पादन झालें. १९३६-३७ सालीं झालेल्या उत्पादनाच्या आंकड्यापेक्षां हा आंकडा सुमारें ६% नीं मोठा आहे.

### संयुक्त प्रांतांत इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स बिल

मुंबई सरकारच्या इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स बिलाचे धर्तीवर संयुक्त प्रांत सरकार एक बिल तयार करीत आहे. मुंबई सरकारच्या बिलावरील चर्चा आणि त्यास झालेला विरोध लक्षांत घेऊन तें सरकार आपल्या बिलाची मांडणी करणार आहे.

### महायुद्धांतील जिवंत बळी

गेल्या महायुद्धांत जखमी झालेल्यांपैकी अगर आजारी पडलेल्यांपैकीं सुमारें दोन हजार लोक अद्याप ग्रेट ब्रिटनमधील इस्पितळांत पडून आहेत.

### तुर्कस्तानांतील सुधारणा

शहरांतील दुकानदारांनीं आपल्या मालाच्या किंमती निश्चित करून त्या दर्शविणाऱ्या चिठ्या त्यावर लावल्या पाहिजेत, किंमतीबद्दल हुजत घालतां कामा नये, असा कायदा तुर्कस्तानानें केला आहे. पांचशेपेक्षां अधिक कामगार ज्या कारखान्यांत असतील, त्या कारखान्याचे मालकानें आपल्या कामगारांसाठीं तालीम, क्रीडांगण आणि पोहण्याचा तलाव ह्यांची सोय केलीच पाहिजे, असाहि निर्बंध घालण्यांत आला आहे.

### स्टॉक एक्सचेंजचे पगारी अध्यक्ष

नेटिव्ह शेअर अँन्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशनच्या (स्टॉक एक्सचेंजच्या) अध्यक्षाचे जागीं ज्यास आपला सर्व वेळ त्या कामाकडे खर्चतां येईल, अशा सभासदास निवडावें, असें असोसिएशननें ठरविलें आहे आणि ही जागा मि. आर. पी. श्रॉफ ह्यांस देऊं केली आहे. श्री. श्रॉफ ह्यांनीं स्टॉक एक्सचेंजवरील आपले व्यवहार थांबवून केवळ अध्यक्षाचेंच काम करण्याचें कबूल केलें आहे. श्री. श्रॉफ ह्यांस ह्या कामाबद्दल दरसाल ५० हजार रुपये ह्याप्रमाणें मोबदला मिळावयाचा आहे.

### म्हैसूर सरकारास विजेपासून मिळणारें उत्पन्न

म्हैसूर सरकारनें सुमारें ३½ कोटि रुपये भांडवल वीजगृहांत गुंतविलें आहे. विजेच्या खपापासून त्या सरकारास १९३७-३८ मध्यें ४४½ लक्ष रुपये निव्वळ नफा झाला. म्हणजे, गुंतविलेल्या भांडवलावर द. सा. द. शें. १३·४० टक्के नफा मिळाला.

### नाताळांतील टपालाची वहातुक

टपालाची आंतरराष्ट्रीय वहातुक आतां विमानानें होऊं लागली असल्यामुळें, नाताळच्या जादा टपालाची ने-आण कशी करावयाची, ही अडचण उपस्थित झाली आहे. लोकांनीं आपलीं पत्रें अगोदरच टाकावींत, पत्रांस आणि पाकिटांस हलक्या वजनाचा कागद वापरावा आणि शक्य तें टपाल आगबोटीचे मार्गानें पाठवावें, अशी विनंति इंपीरिअल एअरवेजनें केली आहे.

### जमीनमहसुलाची वसुली

मुंबई प्रांतांतील सरकारी जमीनमहसुलाच्या १९३७-३८ सालविषयक येण्यापैकीं शेंकडा ९९·७ इतक्या रकमेची वसुली झाली आहे. एकूण ३,४७,६३,००० रुपयांपैकीं ३,४६,४०,००० रुपये जमा झाले आहेत. वरील मुदतीमध्यें १० लक्ष, ४८ हजार रुपयांची माफी देण्यांत आली.

### सरकारी रोख्यांच्या सेटलमेंटचे दिवस

(१) १८ नोव्हेंबर, १९३८
(२) १ डिसेंबर, १९३८
(३) १६ डिसेंबर, १९३८

### तुंगभद्रा नदीवर धरण

तुंगभद्रा नदीवर धरण बांधून त्यांतील पाण्यानें शेतीची जमीन भिजविण्याची कल्पना बरीच जुनी आहे. १८८८ सालीं ह्यासंबंधांत प्रथम योजना आंखण्यांत आली. १९०४ सालीं मद्रास सरकारनें १७ कोटि रुपये खर्चून धरण बांधण्याचें ठरविलें, परंतु धरणाच्या पाण्याखालीं हैद्राबाद संस्थानची बरीच जागा बुडत असल्यामुळें त्या संस्थानची संमति घेणें जरूर झालें. हैद्राबाद सरकारनें ह्या योजनेस अनुमति दिली नाहीं आणि हा प्रश्न असाच सोडून देण्यांत आला. आतां त्याविषयीं पुनः चर्चा चालू आहे.

### वर्षभर टिकणारे लाब

टोकिओ येथील पुष्पसंशोधन संस्थेच्या प्रयत्नानें वर्षभर फुलत रहातील अशीं गुलाबांचीं झाडें तयार झालीं आहेत. ह्या संशोधनकार्यास पंचवीस हजार रुपये खर्च आला.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| ३०-१०-३८ ते ४-११-३८ | ५,४४,४६२ |
| ५-११-३८ ते ११-११-३८ | २२,२३,४९७ |
| २१-९-३१ ते ११-११-३८ | ३,२१,६५,२३,५५४ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५५८ | ५ "मुद्रण प्रकाश" | ५६३ |
| २ वकीलीचा धंदा ... | ५५९ | ६ "शेती आणि शेतकरी" | ५६३ |
| ३ पॅलेस्टाइनची फाळणी रद्द झाली ... ... | ५६० | ७ पेट्रोल ... ... | ५६४ |
| ४ स्फुट विचार | ५६१ | ८ सहकारी-दिन ... | ५६५ |
| हिंद-ब्रिटन व्यापारी करार-हिंदी कपाशीस गिऱ्हाइक नाहीं-हिंदी कपाशीचें भवितव्य-हिंदुस्थानांतील औद्योगिक प्रगति-सहकारी बँकेस बंगाल सरकारचें सहाय | | ९ सहकारी कार्यकर्त्यांची परिषद् ... ... | ५६६ |
| | | १० केमालपाशा ह्यांचें निधन | ५६६ |
| | | ११ तांदूळ ... ... | ५६६ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ५६७ |
| | | १३ श्री. बालसमुद्रम् ह्यांची भेट ... ... ... | ५६७ |


# अर्थ

बुधवार, ता. १६ नोव्हेंबर, १९३८

## वकीलीचा धंदा

शिक्षक, डॉक्टर, वकील इत्यादि सुशिक्षित पांढरपेशा लोकांच्या धंद्यांत इतकी खेचाखेच आणि स्पर्धा होत आहे कीं व्यक्तींच्या उपजीविकेचें साधन आणि समाजोपयोगी कार्य ह्यांच्या दृष्टीनें त्यांस कांहीं तरी व्यवस्थित व आटोपशीरपणाचें स्वरूप देण्याची आवश्यकता भासूं लागली आहे. ह्या धंद्यांतील लोकांस कामाची लायकी मिळवून घेण्यास उच्च शिक्षणक्रमांतून जावें लागतें आणि विशिष्ट पदव्या मिळवाव्या लागतात. हें वेळाचें आणि खर्चाचें काम असतें, आणि त्यांचें मानानें धंद्यांत मिळकत व्हावी अशी अपेक्षा असते. स्वतःच्या पोटापाण्याच्या व्यवस्थेसाठीच शिक्षक, वकील आणि डॉक्टर हे श्रम करून पदव्या आणि लायकी मिळवीत असले तरी त्यांचे धंदे समाजोपयोगी आहेत म्हणूनच त्यांस आपल्या कामाचा मोबदला म्हणून लोकांकडून प्राप्तीची मागणी करतां येते. मुलामुलींस शिक्षण हवें, आजारीपणांत प्रत्येकास औषधपाण्याची जरूरी भासते आणि जनतेच्या हक्कांचें संरक्षण होऊन तिला न्याय मिळावा लागतो. शिक्षण, औषध आणि कायद्याचा सल्ला ह्यांविषयींची लोकांची मागणी पुरवणें वाटेल त्यास साधणार नाहीं. त्यासाठी विशेष लायकीची आवश्यकता असते. ज्याप्रमाणें वाटेल त्यास सुताराचें किंवा लोहाराचें काम करतां येणार नाहीं, वाटेल तो दागिने किंवा भांडीं घडवूं शकणार नाहीं, त्याचप्रमाणें रोग-चिकित्सा, कायद्याची छाननी किंवा बालक-बालिकांचें शिक्षण ह्या गोष्टी कोणीहि करूं शकेल असें नाहीं. "तुका म्हणे तेथें पाहिजे जातीचे, येर गबाळाचें काम नाहीं", ह्या सुप्रसिद्ध साधुवचनाचें स्मरण येथें झाल्यावांचून रहात नाहीं. धंदे आणि पेशे ह्यांचे संबंधांत श्रमविभाग आणि विशिष्टीकरण ह्यांचे तत्त्वावर समाजव्यवस्था होत असते. इतर धंद्यांचे बाबतींत सर्वत्र शिक्षणाची सोय व परीक्षांची व्यवस्था हीं अमलांत आलेलीं नाहींत, तरीहि बुद्धिजीवी लोकांच्या धंद्यांत शिक्षण, परीक्षा व पदव्या ह्यांच्या मर्यादा घालण्यांत आल्या आहेत. वकील, डॉक्टर इत्यादींचे धंदे कोणी करावे आणि त्यांस पूर्वतयारी काय पाहिजे ह्याविषयीं स्पष्ट नियम व कायदेहि आहेत. ठराविक शिक्षणक्रमांतून गेलें असतां वकील, डॉक्टर, शिक्षक ह्यांस काम आणि योग्य वेतन मिळालेंच पाहिजे असा नियम मात्र नाहीं.

पांढरपेशाचे किंवा इतर धंदेवाले लोक समाजसेवक आहेत, हें खरें असलें तरी त्यांच्यापैकी प्रत्येकास श्रमाचा ठराविक मोबदला मिळालाच पाहिजे असा निर्बंध किंवा शाश्वती नाहीं. शेतकरी, कामकरी, व्यापरी, कारखानदार इत्यादि धंदेवाल्यांस पुरेसें काम किंवा कमाई देण्यास समाज बांधलेला नाहीं. ह्या संबंधांत मागणी-पुरवठ्याचा आर्थिक नियम अमलांत येतो. जनतेमध्यें परस्परांच्या कामासंबंधानें मागणी असेल त्याप्रमाणें निरनिराळ्या धंद्यांची सांपत्तिक अवस्था रहाणार हें उघड आहे. विशिष्ट धंदा चालवण्याची लायकी आपण परिश्रमपूर्वक मिळवली असल्यानें आपणांस जरूर तें काम आणि त्याचा योग्य मोबदला देण्यांत आला पाहिजे असा आग्रह कोणी धरल्यास तो फुकट आहे. सुशिक्षितांच्या धंद्यांत आज तीव्र स्पर्धा व बेकारी ही दिसून येत आहेत, त्याच्या मुळाशीं कोणती परिस्थिति आहे ह्याची कल्पना वरील विवेचनावरून येण्यासारखी आहे. वकील, डॉक्टर, शिक्षक इत्यादि लोक आपापल्या कामांत लायक असले तरी त्यांचेकडून काम घेऊन त्यांस मोबदला देण्याची ऐपत जनतेमध्यें नसेल तर त्यांच्या धंद्यांत हलाखी व बेकारी पसरणें अपरिहार्य आहे. दुसरा कोणताहि उद्योग दिसत नाहीं किंवा झेपत नाहीं म्हणून विशिष्टच धंद्यांत शिरण्याची प्रवृत्ति मध्यम वर्गीतील लोकांत आढळून येते. सरकारी नोकरी, सुशिक्षितांची आणि पदवीधरांची संख्या सारखी वाढत चालल्यामुळें दुर्मिळ झाली आहे आणि अनेकांस तिचे दरवाजे बंद झाले आहेत. विश्वविद्यालयांच्या निरनिराळ्या पदव्यांशीं संलग्न असलेल्या धंद्यांत शिरूं पहाणारे वकील, डॉक्टर, इंजिनिअर, शेतकी तज्ञ, शिक्षक, ह्यांच्या कामास आर्थिक मंदीमुळें पूर्वींसारखी मागणी राहिलेली नाहीं. शिवाय, कायद्याचा सल्ला देणारांच्यासारख्या लोकांच्या कामास कांहीं मर्यादा आहेच. न्यायमंदिरांतले तंटे असे कांहीं सारखे वाढूं शकत नाहींत कीं वकीलांच्या वाढत्या संख्येस त्यांनीं काम पुरवीत रहावें. त्याचप्रमाणें, कायद्याचा सल्ला ही अशी कांहीं नित्याच्या जरूरीची गोष्ट नाहीं कीं बेकारीनें सतावलेल्या लोकांनीं त्या कामीं आपला पैसा खर्चीत रहावें. समाजांत वकील, डॉक्टर, शिक्षक, इंजिनिअर किती असावे आणि त्यांस वेतन किती मिळावें ह्यास साहजिक मर्यादा आहेत आणि वेळोवेळ त्या ओळखल्या जाणें आवश्यक आहे.

अलाहाबाद येथें गेल्या आठवड्यांत सर तेजबहादुर सप्रू ह्यांचे अध्यक्षतेखाली वकीलांची मोठी परिषद् भरली होती, तीमध्यें झालेल्या प्रमुख भाषणांचें मनन वर प्रदर्शित केलेल्या विचारांच्या सहायानें केल्यास त्यापासून पुष्कळ उपयुक्त बोध मिळण्याजोगा आहे. काम मिळवण्याच्या धडपडीमध्यें वकीलीच्या धंद्यांत लोक अनिष्ट मार्गांचा अवलंब करीत असल्याबद्दल सर तेजबहादुर ह्यांनीं खेद प्रदर्शित केला आणि कायद्याच्या शिक्षणाची व्यवस्था अधिक कार्यक्षम केली जाण्याविषयीं अवश्य तरतूद व्हावी असें सुचवलें. समाजाच्या आधुनिक प्रगतीबरोबर कायद्याच्या भिन्नभिन्न शाखांचें विशिष्टीकरण चालू आहे, त्यास अनुसरून शिक्षणाची तजवीज झाल्यास अधिक लोकांस वकीलीचें काम मिळूं शकेल अशी त्यांची अपेक्षा आहे. ह्यासाठी सीनिअर आणि ज्यूनिअर वकीलांच्या कामाची योग्य वांटणी होऊन ह्या धंद्याचें चांगलें संघटन व्हावें असें आपलें मत त्यांनीं व्यक्त केलें. वैद्यकाप्रमाणें कायद्याचें शास्त्र असून वकीलीचा धंदा

उच्च दर्जाचा आहे हें त्यांत काम करणारांनीं ध्यानांत बागवावें आणि त्यास कमीपणा आणणारे कित्येक रिवाज रूढ झाले आहेत त्यांचें उच्चाटन करून त्याची शुद्धता व पावित्र्य वाढवलें पाहिजे असें त्यांनीं समव्यवसायी लोकांस कळकळीनें सांगितलें. वकीली करणारांची संख्या मर्यादित करण्याबाबत सर तेजबहादूर ह्यांनीं प्रतिकूल मत प्रदर्शित केलें. डॉ. अस्थाना ह्यांनीं आपल्या भाषणांत वकीलीचा धंदा करणारांस कामाचे नवीन दरवाजे कसे उघडून देतां येतील हें दाखवलें आणि त्यांत शिरण्यास तरुणांस मज्जाव करण्याचे ऐवजीं कायद्याच्या शिक्षणाचा दर्जा व त्याची कार्यक्षमता वाढवण्याचें महत्त्व प्रतिपादलें. वकील लोकांनीं दुसरे धंदे चालवणें बरें नाहीं, कारण त्या योगानें वकीलीचें मुख्य काम चांगलें न होतां तिच्या दर्जास कमीपणा येण्याची भीति आहे असें ते म्हणाले. ह्या दोन वक्त्यांनीं वकीलीच्या धंद्याच्या सद्य:स्थितीवर स्पष्ट प्रकाश पाडून कांहीं विधायक सूचना केल्या त्या उपयुक्त आहेत ह्यांत शंका नाहीं. तथापि, वकीलांच्या कामास समाजाची मागणी आहे तिच्या मानानें शिकून तयार झालेल्या वकीलांची संख्या सध्याच्या वेगानें वाढत गेल्यास त्यांच्यामधील तीव्र स्पर्धा कायम रहाणार आणि तिच्यापासून उत्पन्न होणारे अनिष्ट प्रकार नाहींसे होणें कठीण जाणार ही गोष्ट, सुधारणेचे कितीहि उपाय सुचवले गेले तरी, कायम रहाणार ह्याचा विचार चिंताजनक आहे हें दृष्टीआड करून भागणार नाहीं. हा सामाजिक व राष्ट्रीय हिताचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असून ह्या दृष्टीनेंच त्याचा विचार होणें आवश्यक आहे.

---

## पॅलेस्टाइनची फाळणी रद्द झाली

१९१७ सालीं ग्रेट ब्रिटननें तुर्कीकडून पॅलेस्टाइन हा प्रदेश जिंकला आणि महायुद्धाचे समाप्तीनंतर त्याची "मँडेट" च्या पद्धतीनें व्यवस्था पहाण्याचें काम ग्रेट ब्रिटनकडे आलें. पॅलेस्टाइन हा प्रदेश ज्यू लोकांचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा असल्यानें तिकडे त्यांचा विशेष ओढा आहे. तथापि, स्थानिक अरबांस ज्यू लोकांचा भरणा नको आहे. ज्यू लोकांच्या वाढत्या वसतीस आळा घालण्यांत यावा अशी अरबांनीं मागणी केली आणि अखेर ह्या असमाधानाचें पर्यवसान बंडाळीमध्यें झालें. ज्यू लोकांस पॅलेस्टाइनमध्यें अवसर देण्याविषयीं राष्ट्रसंघानें अभिवचन दिलेलें असलें तरी अरबांस ज्यू लोकांचें तेथून उच्चाटन होण्यास पाहिजे आहे. तेथील परिस्थिति समक्ष अवलोकन करून सूचना करण्याकरितां ब्रिटिश सरकारनें १९३६ सालीं लॉर्ड पील ह्यांचे अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमलें होतें. ज्यू आणि अरब अशीं दोन स्वतंत्र राष्ट्रें निर्माण करण्यांत येऊन त्यांचेमध्यें पॅलेस्टाइनचा प्रदेश वांटून टाकण्यांत यावा असें कमिशननें सुचविलें होतें आणि पॅलेस्टाइनमधील पवित्र स्थळांचें संरक्षण व्हावें आणि तेथें सर्वांस अनिर्बंध प्रवेश मिळावा ह्याकरितां एक स्वतंत्र मँडेटची योजना करण्याविषयीं कमिशननें शिफारस केली होती. पील कमिशनच्या सूचनांस अनुसरून तपशीलवार सल्ला देण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें एक कमिशन नेमलें होतें, त्याचा रिपोर्ट आतां प्रसिद्ध झाला आहे.

पील कमिशननें सुचविलेल्या फाळणीचे योजनेविरुद्ध आपलें मत ह्या कमिशननें एकमुखानें नमूद केलें आहे, आणि त्यास अनुसरून ब्रिटिश सरकारनें आपला मनोदय जाहीर केला आहे. ज्यू आणि अरब लोकांसंबंधीं ग्रेट ब्रिटननें स्वीकारलेली जबाबदारी पार पाडण्यासाठीं दुसरी एकादी योजना तयार होईपर्यंत सध्याप्रमाणेंच सबंध पॅलेस्टाइनचा कारभार स्वत: पहाण्याचें आपलें धोरण ब्रिटिश सरकारनें स्पष्ट केलें आहे. अरब आणि ज्यू ह्या दोघांसहि संमत अशी व्यवस्था झाली तरच पॅलेस्टाइनमध्यें कायम शांतता नांदूं शकेल ह्या दृष्टीनें ब्रिटिश सरकारनें एक मंडलाकार परिषद् बोलावण्याचें ठरविलें आहे. पॅलेस्टाइनमधील अरब आणि ज्यू लोकांशीं त्याचप्रमाणें आजूबाजूच्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींशीं चर्चा करण्यासाठीं त्यांच्या प्रतिनिधींस निमंत्रण करण्याचें सरकारनें योजिलें आहे. जे अरब पुढारी बंडाळीस कारणीभूत झाले अशी सरकारची खात्री आहे, अशा लोकांस या परिषदेंत भाग घेऊं देण्यास ब्रिटिश सरकार तयार नाहीं आणि परिषद् निष्फळ ठरल्यास, सरकार त्यास इष्ट वाटेल तें धोरण आखण्यास मोकळें राहील असें त्यानें स्पष्ट जाहीर केलें आहे.

पॅलेस्टाइनच्या प्रश्नाचा निकाल लावण्याकरितां ब्रिटिश सरकारनें मंडलाकार परिषद् बोलावून, निश्चयात्मक पाउल टाकण्याची आपली जबाबदारी पुढें ढकलली आहे. ज्यू आणि अरब ह्यांच्या मागण्या इतक्या परस्पर-विरोधी आहेत, कीं त्यांचा मेळ घालणें अशक्यप्राय आहे. ज्यू आणि अरब ह्या दोघांसहि खुष करण्याची बिकट कामगिरी ब्रिटिश सरकारास पार पाडावयाची आहे, परंतु परिषदेच्या घोषणेनें अरबांचें मुळीच समाधान झालेलें नाहीं, असें दिसतें. अरबांस आपलेकडे ओढून घेण्याचा यत्न इटली, जर्मनी, इत्यादि राष्ट्रें करीत आहेत आणि ज्यू लोकांचे विरुद्ध कायदे करून, आपण अरबांचे बाजूनें आहोंत असें तीं भासवीत आहेत. ह्याच दृष्टीनें ग्रेट ब्रिटन परिषदेस इराक, सिरिया, इजिप्त, ट्रॅन्सजॉर्डेनिया, इत्यादींस निमंत्रण पाठविण्याचा संभव आहे. ज्यू लोकांचेसंबंधीं जगांत सहानुभूति पुष्कळ असली तरी तिचा प्रत्यक्ष उपयोग विशेष होण्यासारखा नाहीं. अमेरिकेनें नियोजित परिषदेचें स्वागत केलें आहे. अरब अगर ज्यू ह्यांपैकी कोणाचे तरी किंवा दोघांचेहि हक्क मर्यादित केल्याविना तडजोड होणें शक्य नाहीं. अशी तडजोड घडवून आणण्याचें बिकट कार्य ग्रेटब्रिटनला करावयाचें आहे. परिषदेंतील चर्चा आणि तिचा निष्कर्ष ह्यांकडे सर्वांचे डोळे लागून रहातील, हें उघड आहे.

---

### इटलीचा वाढता व्यापार

इटलीचा पूर्व आफ्रिकेशीं व्यापार वाढत चालला आहे. सुएझच्या कालव्यांतून माल नेणाऱ्या इटालियन आगबोटींस भारी जकात द्यावी लागते, ती कमी व्हावी ह्याविषयीं इटलीचा प्रयत्न चालू आहे.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना गेस्ट हाउस

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

# स्फुट विचार

## हिंदी कपाशीचें भवितव्य

प्रस्तुत मंदीचें प्रमुख लक्षण शेतीच्या मालाच्या बाजारभावांत झालेली घट हें आहे. ह्याबाबतींत सुधारणा होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत ही गोष्ट चिंताजनक आहे. हिंदी कपाशीचे भाव तर विशेष खालावले असून त्या पिकाचें भवितव्य कठीण होऊन गेलें आहे. एकतर, कपाशीची पैदास अनेक देशांत वाढत असून तेथील हिंदी कपाशीच्या निर्गतीस असलेली मागणी मर्यादित होत चालली आहे. दुसरें, कपाशीस रेयॉनसारखे प्रतिस्पर्धी निर्माण झाले असून तिच्या उठावाचे मार्गांत त्यांनीं व्यत्यय उत्पन्न केला आहे. तिसरें, प्रत्यक्ष हिंदुस्थानांत अमेरिकन व इजिप्शन लांब धाग्याच्या कापसाची आयात वाढत आहे. हिंदी गिरण्यांची प्रगति उच्च दर्जाचें आणि तलम कापड वाढत्या प्रमाणांत बनवण्यावर अवलंबून असल्यानें ही परदेशी कापसाची आयात अनिर्वाह्य झाल्यासारखी दिसत आहे. हिंदी कपाशीचा दर्जा सुधारून स्वदेशी गिरण्यांस लांब धाग्याचा कापूस पुरवणें हा सदरहू आयातीवर उपाय आहे, परंतु तो परिणामकारक रीतीनें अजून अमलांत आलेला नाहीं.' हिंदी शेतकऱ्यांच्या जीविताशी ह्या प्रश्नाचा अत्यंत निकट संबंध असून देशी कपाशीच्या किंमती चढण्यासाठी काय योजना कराव्या ह्याचा विचार हिंदुस्थान सरकार आणि प्रांतिक प्रधानमंडळें ह्यांनीं काळजीपूर्वक करणें आवश्यक आहे. शेतकरी वर्गाची मिळकत जोंवर वाढत नाहीं तोंवर हिंदी राष्ट्राच्या आर्थिक सुधारणेचा प्रश्न सुटणें कठीण आहे.

---

## हिंदी कपाशीस गिऱ्हाइक नाहीं

कपास पेरणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांचे वाईट दिवस लवकर संपण्याचा रंग दिसत नाहीं; कारण हिंदुस्थानांतील कपाशीखालील जमीनींचें क्षेत्रफळ वाढत असून मालास भाव येत नाहीं आणि दिवसानुदिवस हिंदी कपाशीचें गिऱ्हाइकहि कमी होत चाललें आहे. १९३७-३८ सालीं हिंदुस्थानांत २ कोटि, ७३/४ लक्ष एकरांत कपास पेरण्यांत आली होती. १९३८-३९ च्या पेरणीचा अंदाज सुमारें २ कोटि १५ लक्ष एकर इतका आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत २,१२,०४२ टन कपाशीची निर्गत झाली; हा आकडा गेल्या वर्षाच्या तत्सम मुदतीच्या मानानें १,०६,४२७ टनांनीं लहान आहे. जपानच्या खरेदींमध्यें फारच मोठी घट पडली. १९३७-३८ च्या पहिल्या सहामाहींत त्या देशानें १,७८,३१० टन हिंदी कपास घेतली होती; चालू वर्षाच्या सहामाहींत त्या देशाकडे फक्त ९७,४०५ टन हिंदी कपास रवाना झाली. ग्रेट ब्रिटननेंहि हिंदी निर्गत कपाशीची उचल कमी केली. एकीकडे हिंदी कपाशीची कमी होत चालली असतांना विदेशी कपाशीची हिंदुस्थानांत आयात फुगत चालली आहे. १९३५-३६ च्या पहिल्या सहा महिन्यांत हिंदुस्थानानें २७१/२ हजार टन विदेशी कपास घेतली; १९३६-३७ च्या तत्सम मुदतींत ५५ हजार टन विदेशी कपास हिंदुस्थानांत उतरली, आणि १९३७-३८च्या पहिल्या सहामाहींत ६३ हजार टन विदेशी कपाशीची आयात झाली. कपाशीच्या ऐवजीं रेयॉनचा म्हणजे कृत्रिम रेशमाचा कापड विणण्याकडे उपयोग करण्याची प्रवृत्ति हिंदुस्थानांत वाढत आहे, त्यामुळेंहि देशी कपाशीचें गिऱ्हाइक कमी होत चाललें आहे. १९३६-३७ मध्यें १३/४ कोटि पौंड रेयॉनचें सूत हिंदुस्थानानें आयात केलें आणि तें विणण्यासाठी जपानहून ६० हजार माग मागविले. ह्या परिस्थितींत देशी कपाशीचे बाजारभाव वाढण्याचीं चिन्हें तूर्त तरी दिसत नाहींत. कपाशीचा दर्जा सुधारून तिच्या पिकाचें नीट नियंत्रण केल्यास आणि विदेशी कपाशीची आयात थांबविल्यास त्याचा इष्ट परिणाम होईल. परंतु, ह्या बंदीमुळें परदेशी कापडाच्या तोडीचें कापड हिंदी गिरण्यांस काढतां येणें कठीण जाईल आणि विदेशी कापडाच्या आयातीस उत्तेजन मिळेल. ह्या अडचणींतून योग्य तो मार्ग काढणें अवघड असलें तरी त्याबाबत प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत.

---

## हिंद-ब्रिटन व्यापारी करार

हिंदुस्थान आणि ग्रेटब्रिटन ह्यांच्यामध्यें व्यापाराबाबत करार व्हावयाचा आहे, त्याच्या वाटाघाटींचा निकाल सारखा लांबणीवर पडत चालला आहे. ब्रिटिश सरकार, ब्रिटिश कारखानदार, हिंदुस्थान सरकार आणि हिंदी कारखानदार असे एकूण चार पक्ष ह्या वाटाघाटींशी संबद्ध आहेत. ब्रिटिश आणि हिंदी सरकारांस आपापल्या देशांतील कारखानदारांची बाजू उचलून धरणें प्राप्त आहे आणि ह्या कारखानदारांची एकवाक्यता होणें कठीण झालें आहे. ब्रिटिश कारखानदारांस विशेषतः त्यांचा कापडाचा माल ह्या देशांत सवलतीच्या अटींवर येण्याची मुभा हवी आहे आणि हिंदी कारखानदारांस ब्रिटिश मालाची आयात जेवढी मर्यादित होईल तेवढी इष्ट आहे. हिंदी कपाशीची वाढती आयात इंग्लंडमध्यें करण्याचें आमिष दाखवून ब्रिटिश कारखानदार हिंदी कापड-बाजारांत जकातीच्या सवलती मागत आहेत. सर महमद झाफरुल्लाखान विलायतेहून परत आले तेव्हां त्यांनीं ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या व सरकारच्या अटी बरोबर आणल्या. त्यांच्यासंबंधांत हिंदी व्यापारी प्रतिनिधींचें बोलणें ऐकून घेऊन त्यांत फेरफार सुचवण्याचें काम हिंदुस्थान सरकारनें करावयाचें आहे. ह्या कामांत दिरंगाई होत असून येत्या जानेवारीपर्यंत त्यास निश्चित स्वरूप येईल असा रंग दिसत नाहीं. हिंदुस्थानचे व इंग्लंडचे इतर देशांशीं व्हावयाचे व्यापारी करार ह्या वाटाघाटींच्या निकालावर अवलंबून आहेत. प्रस्तुत प्रकरणीं हिंदी कपाशीची निर्गत आणि कापडाची आयात ह्यांच्या प्रमाणाचेंच विशेष महत्त्व असल्यानें हिंदी कापड-गिरण्यांस मिळत असलेल्या जकातीच्या संरक्षणाचा प्रश्न टारिफ बोर्डाकडे चौकशीसाठी पाठवण्याचा विचारहि सरकारास लांबणीवर टाकावा लागत आहे.

---

## हिंदुस्थानांतील औद्योगिक प्रगति

सर स्टॅन्ले रीड ह्यांनीं "लॉइड्स बँक मंथली रिव्ह्यू" मध्यें एक लेख लिहून त्यांत हिंदुस्थानच्या चालू शतकांतील प्रगतीवर आपले विचार प्रदर्शित केले आहेत. "पंचवीस वर्षांपूर्वी भांडवलाचे अभावीं हिंदी उद्योगधंदे खुंटले जात; आतां मागणीचे मानानें भांडवलाचा पुरवठा विपुल आहे," हें त्यांचें विधान सर्वांस मान्य होईल. हिंदुस्थान सरकारास आतां ह्या देशांतच पाहिजे तेवढें कर्ज मिळूं शकतें आणि नवीन औद्योगिक उपक्रमांस भांडवलाची अडचण पडत नाहीं हा नित्याचा अनुभव आहे. नियोजित धंद्यांत पैसे सुरक्षित रहातील एवढी खात्री असली म्हणजे कमी व्याज पडलें तरी लोक आपले पैसे उद्योगधंद्यांत घालण्यास तयार असतात, ही गोष्ट महाराष्ट्रांत सिद्ध झाली आहे. " हिंदी औद्योगिकरणाची

प्रगति बरीच झाली असली तरी शेतीच्या धंद्याची उत्पादकता वाढण्यास अद्याप पुष्कळच वाव आहे" असें सर स्टॅन्ले ह्यांनी आपल्या लेखांत म्हटलें आहे. हिंदुस्थानाची लोकसंख्या वाढत आहे; परंतु शेतीखालील क्षेत्रांत वाढ होण्याजोगी नाहीं. तेव्हां, शेतीचें दर एकरी उत्पादन वाढविल्याविना भागणार नाहीं, हें स्पष्ट झालें आहे. प्रत्येक मनुष्याशीं शेतीच्या क्षेत्रफळाचें पडणारें प्रमाण घटत चाललें आहे, तरी दर एकरी उत्पादनांत समाधानकारक वाढ होत नाहीं, ही चिंताजनक गोष्ट आहे. "हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांची प्रगति पाश्चात्य देशांतील प्रगतीचे धर्तीवर होत आहे; स्थानिक परिस्थितीच्या विचारास मिळावें तेवढें प्राधान्य मिळत नाहीं" असा सरसाहेबांचा अभिप्राय आहे. नवीन उद्योगधंद्यांच्या स्थापनेचा विचार चालू असतांना मोटारींच्या उत्पादनास देण्यांत येणारें महत्त्व वरील विचारास पुष्टिकारक आहे. मोटारींच्या उत्पादनापेक्षा ज्यास्त मूलग्राही महत्त्वाचे धंदे स्थापन होण्याच्या शक्यतेकडे काँग्रेसच्या प्लॅनिंग कमिशनचें लक्ष जाईल अशी आशा आहे. ब्रिटिश भांडवलाची आतां हिंदुस्थानांत आवश्यकता उरलेली नाहीं; विदेशी तज्ञ आणि हिंदी भांडवल ह्यांच्या सहकारास मात्र अद्याप वाव आहे, असें सर स्टॅन्ले रीड म्हणतात. प्रांतिक सरकारांच्या पुरस्कारानें स्थापन झालेल्या कारखान्यांत हिंदी उमेदवारांस जरूर तें शिक्षण मिळण्याची सोय झाली म्हणजे देशी धंद्यांस हिंदी तज्ञांचा अभाव फार काळ भासणार नाहीं आणि हिंदुस्थानच्या खऱ्या औद्योगीकरणास प्रारंभ झाला असें म्हणतां येईल.

---

### सहकारी बँकेस बंगाल सरकारचें सहाय

आर्थिक मंदीमुळें सहकारी संस्थांचीं सभासदांकडून परत यावयाचीं कर्जें तुंबून पडलीं आहेत आणि कित्येक ठिकाणीं तीं साफ बुडालीं आहेत. अशा परिस्थितींत त्यांस पैसा पुरवणाऱ्या मध्यवर्ती बँकांची कुचंबणा होऊन त्यांच्या व्यवहारांत व्यत्यय येत आहेत. ह्या संस्थांनीं लोकांकडून पैसा घेतला आहे आणि तो परत दिला पाहिजे. बँकांवरचा जनतेचा विश्वास कायम रहाण्यास परतफेडीची व्यवस्था खात्रीची असली पाहिजे. शेतकी पतपेढ्यांस कमी व्याजानें आणि सवलतीनें कर्जें मिळणें एका बाजूनें आवश्यक आहे आणि दुसऱ्या बाजूनें त्यांच्या परतफेडीची व्यवस्था समाधानकारक झाली पाहिजे. ह्या कचाट्यांत सांपडलेल्या मध्यवर्ती बँकांस सरकारचें सहाय मिळाल्यावांचून सहकारी चळवळीची दुरवस्था सुधारणें अशक्य आहे. बंगालच्या प्रांतिक सरकारानें आपल्या मध्यवर्ती बँकेस दरवर्षी दोन लक्ष ह्याप्रमाणें एकूण चोवीस लक्ष रुपयांची मदत देण्याचें ठरविलें आहे हें धोरण अभिनंदनीय असून इतर प्रांतांत, विशेषतः मुंबई इलाख्यांत, अनुकरणीय आहे. ह्या मदतीचा उपयोग पतपेढ्यांचें झालेलें नुकसान भरून काढण्याकडे व कर्जावरील व्याजाचे दर कमी करण्याकडे व्हावयाचा आहे. बंगालमधील कित्येक बँकांच्या व्यवहारांत अनिष्ट प्रकार आढळले असून त्याबाबतींत जबाबदार असलेल्या लोकांविरुद्ध योग्य इलाज केले असल्याचें सरकारी ठरावांत म्हटलें आहे.

---

६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा

मोती चौक : : : सातारा

दि प्रॉव्हिन्शिअल बँक

ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय: २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगळूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर: अेस्. पी. ठाकर.

करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्: १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्: ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयांपर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

कायम मुदतीच्या ठेवी: दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट, पुणें. | एच. जी. गद्रे, एजंट लक्ष्मीरोड, पुणें. २

### " मुद्रण-प्रकाश "

पुणें प्रेस ओनर्स असोसिएशनतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या, छापखान्याच्या व तदंगभूत धंद्यांच्या विषयास वाहिलेल्या ह्या त्रैमासिकाच्या पहिल्या वर्षाचा चौथा अंक प्रसिद्ध झाला आहे. मुद्रण धंद्यासंबंधीं स्वतंत्र त्रैमासिक चालविण्यांत चालकांस येणाऱ्या अडचणींस तोंड देऊन त्यांनीं हें कालिक यशस्वी रीतीनें चालविलें, ह्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. " मुद्रण-प्रकाश"च्या ऑक्टोबर १९३८ च्या अंकांत चढाओढीचे अनिष्ट प्रकार, मराठी शुद्धलेखनासंबंधीं एक नवा विचार, धंदा कसा वाढेल, तरुण पिढीकरितां एक नवें दालन, मुद्रण-सुकर देवनागरी लिपी, पुस्तक बांधणी, यंत्र आणि प्रवंगण, घातक स्पर्धेवर उपाय, इत्यादि विषयांवर उपयुक्त लेख प्रसिद्ध झाले आहेत. एकाच धंद्यांतील लोकांचें सहकार्य, एकमेकांत स्पर्धा असतांनाहि, सर्वांच्या उन्नतीस सहायकारक होतें हें तत्त्व पाश्चात्य राष्ट्रांतील धंदेवाल्यांस पटलेलें आहे. हिंदी छापखानेवाल्यांच्या धंद्यांतील चढाओढ घातुक स्वरूपाची आहे, हें श्री. पटवर्धन यांनीं आपल्या लेखांत दाखवून त्यावर "एकीकरण" हा उपाय सुचविला आहे. "मुद्रण-प्रकाशना"ची योजनाहि सहकार्याचे पायावरच झालेली असल्यानें, ह्या त्रैमासिकाचें खरें कार्य छापखानेवाल्यांच्या संघटनावरच अवलंबून आहे हें उघड आहे. वरील त्रैमासिकाचें आतां दुसऱ्या वर्षांत पदार्पण होत आहे; आम्ही त्यास यश इच्छितों.

---

### "शेती आणि शेतकरी"

वरील मासिकाच्या नोव्हेंबर १९३८ च्या अंकांत "अर्था"च्या १४ सप्टेंबरचे अंकामधील अग्रलेखाचा प्रामुख्यानें उल्लेख करण्यांत आला आहे. खाण्याचे पदार्थ व कच्चा माल ह्यांची सरकारी देखरेखीखालीं सांठवण करण्याच्या आवश्यकतेसंबंधीं ग्रेट ब्रिटनमधील अर्थशास्त्रज्ञांच्या योजनेची माहिती त्या अग्रलेखांत देण्यांत आली होती आणि कौटिल्याच्या पण्याध्यक्षाचाहि उल्लेख त्यांत करण्यांत आला होता "या देशांत खेड्यांतून असणारीं पेवें, जमीनदारांच्या घरीं असलेलीं कोठारें व घरोघरीं असलेल्या कणगी यावरून मालाच्या सांठवणीची पद्धत हिंदुस्थानांत सार्वत्रिक होती. देशांत मालच शिल्लक नसला अगर उत्पन्न झाला नाहीं तर वहातुकीचीं साधनें असून नसल्यासारखींच होतात असा अनुभव आलेला आहे. ह्या देशांत पूर्वापारचा प्रघात फिरून चालू करणें इष्ट आहे किंवा नाहीं याचा विचार करणें गैरवाजवी होणार नाहीं " असें 'एक शेतकरी' वरील मासिकांतील आपल्या लेखांत म्हणतो. मासिकाच्या ह्या अंकांत शेतकीविषयक इतर अनेक उपयुक्त लेख प्रसिद्ध झाले आहेत.

---

### टेनन्सी बिलाचा मसुदा

संडकरी कायद्याचा मसुदा मुंबई प्रांतिक विधिमंडळास गेल्या आठवड्यांत सादर करण्यांत आला.

### फ्रान्सची उतरती लोकसंख्या

सन १९२० ते १९२७ ह्या मुदतींत फ्रान्समधील जननाचें प्रमाण शेकडा १८ टक्क्यांनीं उतरलें आहे. गेल्या तीन वर्षांत जननापेक्षा मृत्यू २० हजारांनीं अधिक झाले. ह्या गतीनें ५० वर्षांत फ्रान्सची लोकसंख्या १½ कोटींनीं घटेल.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.



स्त्रियांना शिवणकामाबरोबरच विणकाम, भरतकाम, काशिदा यांचेंहि शिक्षण स्त्री-शिक्षकांकडून देण्याची नवीन सोय केली आहे. माहिती मागवा अगर समक्ष भेटा.
पत्ताः—जाधव टेलरिंग कॉलेज, ४९७ बुधवार चौक, पुणें २.

धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,०५,५०,००० |

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ).

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.

## पेट्रोल

[ मोलॅसेसपासून पॉवर अल्कोहोल बनविण्याचा यत्न मुंबई सरकार करीत आहे. ह्या दृष्टीनें, खालील माहिती उपयुक्त वाटेल ]

पेट्रोल आतां सर्वांच्या परिचयाचें झालें आहे. तथापि, ह्या पदार्थाचें उत्पादन ८० वर्षांपूर्वी माहित नव्हतें! १८५७ सालीं रुमानिया देशानें २७५ मेट्रिक टन* पेट्रोलचें उत्पादन केलें; १८५९ सालीं अमेरिकेनें २७४ मेट्रिक टन पेट्रोल काढलें; त्यानंतर इटली, कॅनडा आणि रशिया हे देशहि पेट्रोलचें उत्पादन करूं लागले. वीस-पंचवीस वर्षांपूर्वीपर्यंत पेट्रोलपेक्षां केरोसीन तेलाचेंच विशेष महत्त्व होतें, आणि त्याचा उपयोग दिव्यासाठी आणि स्टोव्हसाठी म्हणून होत असे. इंटर्नल कंबश्चन इंजनाचा शोध लागल्यापासून पेट्रोलचें महत्त्व वाढत गेलें. मोटारगाड्या, विमानें ह्यांची प्रगति होत गेली, त्याबरोबर त्यांचें जळण म्हणून पेट्रोलचेंहि महत्व वाढलें. आज पेट्रोलच्या धंद्यावर जगांतील अनेक व्यवसाय अवलंबून असून बहुतेक आर्थिक उलाढालींचे मुळाशीं ह्या द्रव्याचा संबंध पोचतो. पेट्रोलियमचे धंद्यांत अमेरिकेचें अग्रस्थान आहे. दुसऱ्या जागेसाठी रशिया आणि वेनेझुएला ह्यांची स्पर्धा आहे. इराणमधील उत्पादन आतां वाढूं लागलें आहे आणि रुमानियांतहि हा धंदा प्रगतिपथावर आहे. पेट्रोलच्या उत्पादनांत इराकचें महत्त्व वाढत आहे. पेट्रोलच्या एकूण उत्पादनापैकीं शेकडा ९५ इतक्या पेट्रोलचें उत्पादन फक्त ८ देशांत होतें, आणि त्यावरील ताबा कांहीं प्रचंड कंपन्यांचे हातीं आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील कांहीं देशांत पेट्रोलच्या खाणी सांपडण्याचा संभव आहे; तथापि एकट्या अमेरिकेंतील उत्पादनाशीं देखील त्या देशांस बरोबरी करतां येईल असें वाटत नाहीं. कोळशापासून आणि इतर अनेक पदार्थांपासून कृत्रिम रीतीनें पेट्रोल बनविण्यास कित्येक देशांनीं प्रारंभ केला आहे. साखरेच्या कारखान्यांतून वाया जाणाऱ्या मोलॅसेसपासून पॉवर अल्कोहोल करण्याचा मुंबई सरकार प्रयत्न करीत आहे हें प्रसिद्धच आहे. हलक्या दर्जाच्या तेलाचाहि पेट्रोलचे जागीं उपयोग करण्याची प्रवृत्ति वाढत आहे. तथापि आणखी कांहीं वर्षांनीं ह्यांपैकीं कोणत्या प्रकारच्या जळणाचें महत्व वाढेल हें आंजच सांगतां येणें कठीण आहे.

(* १ मेट्रिक टन=२६४·१७ गॅलन.)

## आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

आयुर्वेद रसशाळा पुणें, लि. या कंपनीच्या संस्थापकांपैकी व चालकांपैकीं एक आणि त्या कंपनीचे प्रारंभापासूनचे सेक्रेटरी वे. प. र. गोडबोले हे राजीनामा देऊन ता. १ नोव्हेंबरपासून कंपनीचें काम सोडून गेले. त्यांस निरोप देण्याचा समारंभ ता. ३१।१०।३८ रोजीं आयुर्वेद रसशाळेंत करण्यांत आला. त्या प्रसंगीं त्यांच्या आजवरच्या कार्याच्या गुणवर्णनपर भाषणें, फोटो पानसुपारी, अल्पोपहार इ. कार्यक्रम होऊन समारंभ समाप्त झाला.

## बंगाल प्रांतांतील सहकारी चळवळ

"बंगाल प्रांतिक सहकारी बँकेस दरसाल २ लक्ष रुपये ह्याप्रमाणें २४ लक्ष रुपयांची मदत देण्याचें बंगाल सरकारनें ठरविलें, ही गेल्या वर्षांतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. कांहीं सेंट्रल आणि अर्बन बँकांत आढळून आलेल्या अफरातफरींमुळें सरकारास अत्यंत काळजी वाटत आहे. हिशेब तपासणीची जास्त कडक व्यवस्था सरकारनें केली आहे. गेल्या वर्षी ५०० सुखसंपत्तिसंवर्धक सोसायट्यांची स्थापना झाली.":—बंगाल प्रांताच्या सहकारी खात्याच्या १९३७ सालविषयक अहवालावर सरकारचा अभिप्राय.

## इनकमटॅक्स बिलांत सुचविलेल्या दुरुस्त्या

### सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट

इनकम टॅक्स बिलावरील सिलेक्ट कमिटीनें मध्यवर्ती असेंब्लीस आपला रिपोर्ट गेल्या आठवड्यांत सादर केला. कमिटीनें बिलांत खालील दुरुस्त्या केल्या आहेतः—

( १ ) 'डिव्हिडंड" चे व्याख्येंत बोनस शेअर्स येऊं नयेत. ( २ ) मॅनेजिंग एजन्सीची मिळकत दोन किंवा अधिक लोकांत वाटली जात असल्यास, प्रत्येकास मिळावयाच्या उत्पन्नावरच कराची आकारणी व्हावी. ( ३ ) हिंदु अविभक्त कुटुंबांचे बाबतींत १२ हजारांपर्यंतचे विम्यावरील हप्त्यास करमाफी मिळावी. ( ४ ) पति आणि पत्नी ह्यांच्या उत्पन्नाच्या बेरजेच्या रकमेस जो दर लागूं होईल, त्या दरानें त्यांच्या प्रत्येकाच्या उत्पन्नावर कर आकारणी व्हावी, अशी मूळ बिलांत योजना होती, ती रद्द करण्यांत यावी. ( ५ ) करास पात्र असूनहि उत्पन्नाचा तक्ता सादर न करणारास शासन सांगितलेलें आहे, त्या कलमांत ३,५०० रुपयांखालील उत्पन्नदारास शासन होऊं नये अशी दुरुस्ती व्हावी. ( ६ ) मागील सहा वर्षांतील उत्पन्नावर जादा कर लादण्याचा अधिकार इनकम टॅक्स अधिकाऱ्यास मूळ बिलानें दिला होता; सहा ऐवजी चार वर्षांची मुदत असावी आणि सहेतुक उत्पन्न लपविणारांचे बाबतींत आठ वर्षे मागें जातां यावें. ( ७ ) इनकम टॅक्सचे बाबत निवाडा देण्यासाठीं एक अपील कोर्ट नेमण्यांत यावें आणि त्या कोर्टाकडून हायकोर्टाकडे अपील करतां यावें, इ.

### ४९ व्या कलमास विरोध

इनकम टॅक्स बिलांतील ४९ व्या कलमानुसार हिंदुस्थानांतील विदेशी कंपन्यांस आणि लोकांस मिळावयाच्या करमाफीची रकम १ कोटि, ३० लक्ष रुपये भरते. ह्या कलमांतील परस्पर-सवलतीच्या व्यवस्थेमुळें इंग्लंडांतील हिंदी कंपन्यांस आणि व्यक्तींस फक्त ३ लक्ष रुपये इतकाच कर माफ होतो. बिलांतील हें कलम गाळल्यास हिंदुस्थानाची वार्षिक १ कोटि, २७ लक्ष रुपयांची बचत होईल आणि नीमायर योजनेप्रमाणें प्रांतिक सरकारांस ती रकम वांटून मिळेल. प्रांतांच्या मुख्य प्रधानांनीं गव्हर्नर जनरलला तार करून प्रस्तुत ४९ वें कलम बिलांतून वगळण्याबाबत त्यास विनंति करावी असें पार्लमेंटरी सब कमिटीचे अध्यक्ष, श्री. वल्लभभाई पटेल, ह्यांनीं सुचविलें आहे.

### दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि.

वरील बँकेसंबंधीं "अर्था" च्या ता. २ नोव्हेंबरचे अंकांत माहिती आली आहे, त्यामध्यें संचालक मंडळाचे यादींत श्री. सावरकर हें नांव चुकून छापलें गेलें आहे. बँकेच्या बोर्डावर श्री. सावरकर ह्या नांवाचे कोणीहि गृहस्थ नाहींत.

### "बँक ऑफ महाराष्ट्र" ची मुंबईंत कचेरी

"दि बँक ऑफ महाराष्ट्र" नें मुंबई येथें आपली एक कचेरी ता. १० नोव्हेंबरपासून सुरु केली आहे. ह्या कचेरीचा पत्ता एक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, कोट, मुंबई, असा आहे.

### पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूट, पुणें

पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूटची वार्षिक साधारण सभा रविवार, ता. १३ रोजीं भरली होती. श्री. विनायकराव गणेश तिखे आणि श्री. भालचंद्र त्र्यंबक देवभानकर ह्यांचीं अनुक्रमें अध्यक्ष आणि ऑ. सेक्रेटरी अशी निवडणूक झाली.

## सहकारी दिन

### पुणें

पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूटच्या वियमानें पुणें येथें पुणे सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत शनिवार ता. ५-११-३८ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां श्री. य. रा. दाते, बी. ए. एलएल. बी. यांचे अध्यक्षतेखालीं अखिल भारतीय सहकारी दिनानिमित्त सभा भरविण्यांत आली होती. चळवळीच्या सुधारणेबाबत करावयाचें कार्य, चळवळीच्या नेत्यांवरील जबाबदारी, चळवळीच्या शिक्षणाचें कार्य, वगैरेबाबत निरनिराळया वक्त्यांचीं भाषणें झालीं. चर्चेमध्यें प्रो. एस. आर. भागवत, श्री. कृष्णराव काकडे, श्री. दामुअण्णा पोतदार, श्री. खासनीस, श्री. व्ही. जे. करंदीकर वगैरे मंडळींनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. समारोपादाखल अध्यक्षांनीं भाषण करून चळवळीची सर्वांगीण उन्नति करण्यासाठीं झटण्याची जबाबदारी प्रत्येक सहकारी संस्था व सहकारी कार्यकर्ता यांचेवर आहे असें सांगितलें. नंतर श्री. देवभानकर यांनीं आलेल्या सर्व मंडळींचे आभार मानले.

### धुळें

प. खानदेश जिल्हा इन्स्टिट्यूटनें धुळें येथें शनिवार ता. ५।११।३८ रोजीं सहकारी दिन साजरा केला. सभेचें अध्यक्षस्थान ह्या विभागाचे असि. रजिस्ट्रार श्री. आर. एस. पाटील ह्यांनीं स्वीकारलें होतें. श्री. बी. व्ही. हळवे, सी. इन्स्पेक्टर, मुंबई प्रॉ. को. बँक, धुळें भाग ह्यांचें सहकारी चळवळ-ह्या विषयावर अनुभवयुक्त भाषण झालें. इन्स्टिट्यूटचे चेअरमन श्री. दामोदर गणपत पाटील ह्यांनीं इन्स्टिट्यूटचे कामासंबंधीं माहिती दिली. तसेंच इन्स्टिट्यूटचे सेक्रेटरी श्री. साहेबराव देशमुख ह्यांनींही सहकारी चळवळ हा स्वराज्याचा पाया आहे ह्याबाबत समयोचित भाषण केलें. शेवटीं व्हिलेज अपलिफ्ट कमिटीचे सेक्रेटरी व एक सामाजिक कार्यकर्ते श्री. कानडे यांनीं सदर दिनानिमित्त पास करावयाचा ठराव वाचून दाखविला तो सर्वांनीं उभे राहून पास केला. अध्यक्षांनीं समारोप करून सहकारी चळवळबाबत दोन शब्द सांगितले.

### जळगांव

पू. खानदेश जिल्हा को. इन्स्टिट्यूटचे वियमानें ता. ५ नोव्हेंबर १९३८ रोजीं अखिल भारतीय सहकारी दिन श्री. जी. एच. साळवी, बी. ए. एलएल. बी. डिस्ट्रिक्ट आणि सेशन्स जज्ज यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला.

श्री. डी. व्ही. चौधरी, बी. ए. एलएल. बी. चेअरमन प्रॉ. को. इन्स्टिट्यूट शाखा जळगांव ह्यांचें प्रास्ताविक भाषण झालें. श्री. के. व्ही. जोशी, एम. एजी. डे. डायरेक्टर ॲग्रि. एन. सी. डी. नाशिक, श्री. आर. वाय. सोनवणे बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर पू. खा. सें. बँक जळगांव, श्री. के. आर. प्रधान वकील जळगांव, श्री. सिताराम नाना चौधरी वगैरे प्रमुख पुढाऱ्यांची शेतकरी बंधूंना हलाखीची स्थिति का प्राप्त झाली, पूर्वी ती कशी होती, सहकारिता पूर्वी आपल्यांत होती किंवा नव्हती, तिचा लोप आतां केव्हां व कसा झाला व त्याचा परीणाम आपणांस आज कसा भोगावा लागत आहे व यासाठीं कोणकोणत्या परिस्थितीची अनुकूलता प्राप्त करून घ्यावयाची आहे व ती घेतली असतां सद्यःस्थितीस मूर्त स्वरुप घिम्मेपणानें कां होईना कसें प्राप्त झाल्याशिवाय रहाणार नाहीं, अशाविषयीं कळकळीचीं भाषणें झालीं. शेवटीं अध्यक्षांनीं थोडक्यांत परंतु मार्मिकपणें समारोप केला. आभार प्रदर्शनानंतर सभा संपली.

### तडवळें (ता. बार्शी)

येथील को. के. सोसायटीतर्फे अखिल भारतीय सहकारी दिन सोसायटी ऑफिस समोरील पटांगणांत येथील मराठी शाळेचे हेडमास्तर श्री. किराणे यांचे अध्यक्षतेखालीं थाटानें साजरा करण्यांत आला. प्रथम सभेसंबंधीं प्रास्ताविक भाषण श्री. माधवराव देशपांडे यांनीं केलें. नंतर 'सहकारिता' या विषयावर श्री. बाबूराव देशपांडे यांनीं शेतकरी वर्गास समजेल अशा तऱ्हेनें सांगोपांग माहिती सांगितली. श्री. हरीभाऊ तेलंग, श्री. अपशिंगेकर व श्री. विश्वनाथराव करंजकर यांनीं प्रसंगोपात चालू विषयावर भाषणें केल्यावर श्री. केशवराव पाटील यांनीं मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूट (शाखा सोलापूर) कडून आलेला सहकारी संदेश वाचून दाखविला. नंतर सहकारितेचे दहा मुद्दे येथील सोसायटीचे सेक्रेटरी यांनीं सांगितल्यावर अध्यक्षांनीं समारोपादाखल उपदेशपर चार शब्द सांगितले.

### कळवण

कळवण येथें कळवण तालुका कोऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियनचे ऑफिसांत हा दिन पाळण्यांत आला. अध्यक्षस्थानीं श्रीयुत नागुजी गणपत पाटील, कळवण सुपरवायझींग युनियनचे चेअरमन, हे विराजमान होते. सभेस तालुक्यांतील सोसायट्यांचे सभासद व सर्व ग्रुप सेक्रेटरी हजर होते. तसेंच युनियन सुपरवायझर व बँकेचे एजंट हेही हजर होते. सहकारी दिन व त्याचें महत्त्व यावर युनियनचे सुपरवायझर श्रीयुत नवले यांचें भाषण झालें. हा दिन खराखुरा पाळला जावा व आपापसांत सहकार्य व संघटना उत्पन्न व्हावी व त्यायोगें फायदा व्हावा अशा गोष्टी आजच्या मुहुर्तावर करण्यांत याव्यात असें सांगून सहकार्यानें इतर राष्ट्रांतील लोकांनीं कसकसा फायदा करून घेतला त्याचीं उदाहरणें त्यांनीं सांगितलीं तेव्हां त्याचा योग्य परिणाम होऊन या तालुक्यांतील सहकारी स्टाफनें या मुहुर्तावर सहकारी स्टेशनरी स्टोअर्स व सर्वांस लागणारा कपडा एकत्रित खरेदी करण्याची योजना अमलांत आणण्याचें ठरविलें.

### सोलापूर

सोलापूर डि. को. इन्स्टिट्यूटच्या वियमानें ता. ५-११-३८ हा सोळावा सहकारी दिन येथील डि. लो. बोर्डाचे सभागृहांत संध्याकाळीं ५-३० वाजतां सोलापूर डि. सें. बँकेचे चेअरमन मि. जी. आर. कुंभकोणी बी. ए. एलएल. बी. यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. या समारंभास सुमारें १५० लोक हजर होते. आरंभीं रीतसर अध्यक्षांची निवड झाल्यावर आंतरराष्ट्रीय सहकारी समितीनें सुचविलेला ठराव पास करण्यांत आला. नंतर ऑ. सेक्रेटरी श्री. आण्णासाहेब गव्हाणे यांनीं सदर ठरावांतील प्रत्येक शब्दाचें महत्त्व व ठरावांत सांगितलेलीं सहकारी चळवळीचीं तत्त्वें किती व्यापक, व्यवहारिक व उपयुक्त आहेत हें विशद करून सांगितलें; तसेंच प्रत्येक व्यक्तीस व विशेषतः शेतकऱ्यास आपली आर्थिक, नैतिक, बौद्धिक, सामाजिक व मानसिक उन्नति करून घेण्याकडे आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण कसा उपयोगांत आणतां येईल हें सोदाहरण पटवून दिलें. नंतर येथील सें. बँकेचे मॅनेजर मि. एस. ए. जोशी यांनीं सदर ठरावांतील तत्त्वें मनुष्यमात्राच्या उन्नतीशीं कशी निगडित आहेत हें सांगून सहकारी चळवळीनें शेतकऱ्यांच्या आर्थिक फायद्यांत कशी भर घातली आहे हें स्पष्ट केलें.

नंतर श्री. जे. ई. कुलकर्णी, श्री. मोहोळकर वकील आदिकरून वक्त्यांचीं समयोचित भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं समारोप केला व सभा संपली.

## पुणें जिल्ह्यांतील सहकारी कार्यकर्त्यांची परिषद्

गेल्या मंगळवारीं ता. ८-११-३८ रोजीं, दुपारीं पुणें जिल्ह्यांतील विगर कॅनॉल भागांतील सोसायट्यांचे सेक्रेटरी, यूनिअन सुपरवायझर्स, बँकेची अमलदार मंडळी व सहकारी खात्यांतील ऑडिटर्स वगैरे मंडळींची एक परिषद् श्री. के. जी. प्रभु, असिस्टंट रजिस्ट्रार मध्यभाग, पुणें यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. ही सभा बोलावण्याचा मुख्य उद्देश निवेदन करीत असतां असिस्टंट रजिस्ट्रारसाहेबांनीं सांगत सोसायट्यांच्या सभासदांकडे सालोसाल थकत चाललेल्या कर्जाच्या बोजामधून त्यांची हळूहळू मुक्तता करण्याचे दृष्टीनें सरकारनें मंजूर केलेलें धोरण जमलेल्या मंडळींस विशद केलें.

### हुकूमनाम्यांची अंमलबजावणी

वसुलीच्या मार्गांतील अडचणींचा परिषदेमध्य विचारविनिमय होत असतां, रेव्हेन्यू खात्याकडे बजावणीसाठी पडून असलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी वर्षानुवर्षे कोणत्याना कोणत्या तरी कारणानें दिरंगाईवर पडल्यानें, इतर कर्जदार सभासदांना एक प्रकारची फूसच मिळते व ऐपत असूनहि ते बुद्धिपूर्वक वसूल देत नाहींत अशी एक विचारसरणी परिषदेपुढें प्रामुख्यानें मांडण्यांत आली. त्यावर साधक बाधक दृष्टीनें विचारविनिमय झाल्यावर असिस्टंट रजिस्ट्रार साहेब यांनीं चर्चेचा समारोप करून सांगितलें कीं या वस्तुस्थितीची सरकारला पूर्ण जाणीव झालेली असून सरकारनें जिल्हा रेव्हेन्यू अमलदारांना आतां तशा सूचना केल्या आहेत व जीं निवडक प्रकरणें त्यांना सुचविण्यांत येतील त्यांची बजावणी अत्यंत तांतडीनें व कर्जदारांना कसलीहि सवलत न देतां करण्यांत येणार आहे. शेतीच्या मालाची खरेदीविक्री, शेतकऱ्यांना लागणाऱ्या गरजा पैशाऐवजीं प्रत्यक्ष वस्तू देऊन पुरविणें, वगैरे बाबत सरकारनें केलेल्या नवीन पोटनियमांचीहि माहिती परिषदेला देण्यांत आल्यावर येत्या हंगामांत तुंबलेलीं कर्ज शक्य तेवढीं वसूल करण्याची योजना मुक्रर करण्यांत येऊन परिषदेचें काम बुधवार ता. ९ रोजीं दुपारीं संपलें.

### बँकेचा व्याजाचा दर

याच परिषदेच्या वेळीं व्याजाच्या दरासंबंधानें उपस्थित झालेल्या प्रश्नांवर भाषण करतांना पुणें सेंट्रल को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. द. दी. चितळे, यांनीं बँक कर्जावरील व्याजाचा दर कसा मुक्रर करीत असते, बँकेच्या व्याजाचा दर उतरविणेस काय परिस्थिति निर्माण झाली पाहिजे, वक्तशीर व्याज वसूल होणें कसें आवश्यक आहे, बँक वक्तशीर वसूल देणाऱ्यास रिबेटच्या स्वरूपानें शेकडा दोन टक्क्यांपर्यंत कशी सवलत देत असते, कांहीं बँका बिनव्याजीहि पैसा परत घेण्यास कोणच्या परिस्थितींत तयार झाल्या आहेत वगैरे गोष्टींचें तपशीलवार स्पष्टीकरण केलें. त्याचबरोबर कांहीं बेजबाबदार टीकाकार बँकेच्या सांपत्तिक स्थितीची पर्वा न करतां व्याजाचे दर भरमसाटपणें उतरवावे म्हणून वेळीं अवेळीं ओरड करीत असतात त्यांत कसें बिलकूल तथ्य नाहीं, नाशिक जिल्हा बँक बंद करण्याची आपत्ति सरकारवर कशी ओढवली व तशी स्थिति इतर सहकारी बँकांवर न यावी म्हणून काय खबरदारी घेणें आवश्यक आहे याचेंहि श्री. चितळे यांनीं मार्मिक विवेचन करून सेक्रेटरींना व सुपरवायझर्सना त्यांचेवर असलेल्या जबाबदारीची योग्य जाणीव करून दिली आणि अशा टीकाकारांना बिलकूल किंमत देऊं नये असें सांगितलें.

### लिक्विडेटरांचीं कामें

रद्द झालेल्या सोसायट्यांचे लिक्विडेटर यांचे कामांत दिरंगाई होत असल्यानें त्याचाहि इतरांचे वसुलीवर अनिष्ट परिणाम होत असतो असा एक मुद्दा चर्चेत निघाला होता. त्यावर बोलतांना असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब यांनीं कळविलें कीं, लिक्विडेटर यांचेवर कामाचा बोजा जास्त असल्याचें आढळून आल्यास व तसें जरूर दिसल्यास नवीन लिक्विडेटर नेमण्याचा व जास्त जॉइंट लिक्विडेटर नेमण्याचा विचार सरकार अवश्य करणार आहे.

### साक्षरताप्रसार

या परिषदेस जमलेल्या जिल्ह्यांतील सेक्रेटरींना साक्षरताप्रसाराची माहिती करून देण्यासाठी प्रो. शं. रा. भागवत यांनीं एक व्याख्यान दिलें. प्रो. भागवत यांनीं आपल्या भाषणांत, शेतकरी निरक्षर आहेत व त्यामुळेंच त्यांना सहकाराचें महत्त्व यथायोग्य पटलेलें नाहीं; सबब आतां स्वावलंबनाचे तत्त्वावर प्रौढ स्त्री-पुरुषांमध्यें साक्षरता आणल्याशिवाय सहकारी संस्थांस खरी उपयुक्तता येणार नाहीं असें स्वानुभवाच्या गोष्टी निवेदन करून पटवून दिलें.

---

## मुस्ताफा केमालपाशा ह्यांचें निधन

तुर्कस्तानचे सर्वाधिकारी मुस्ताफा केमालपाशा हे गेल्या आठवड्यांत मरण पावले. गेल्या युद्धांत तुर्कस्तानाचा पराभव झाल्यानंतर, दोस्त राष्ट्रांनीं हा देश ग्रीसचे ताब्यांत देण्याचें योजिलें आणि त्याप्रमाणें ग्रीक फौज खुद्द स्मर्नामध्यें उतरली. परंतु मुस्ताफा केमालनें अत्यंत शौर्यानें त्यांस बाहेर घालवून तुर्कस्तान वाचविला. दोस्त राष्ट्रांचें बाहुलें बनलेल्या सुलतानानें केमालला देहांत शासनाची शिक्षा फर्माविलेली असतांना केमालनें तुर्कस्तानमध्यें क्रांति घडवून आणली! दोस्त राष्ट्रांकडून पराभव पावलेल्या तुर्कस्तानाचा त्यामुळें दर्जा वाढला आणि लॉसेन येथील कराराचे वेळीं ह्या देशास प्रतिस्पर्ध्याच्या बरोबरीचा मान मिळाला. स्वतंत्र तुर्कस्तानाचें आधुनीकरण करून त्याची सर्वांगीण प्रगति घडवून आणण्याचें बिकट कार्य केमालपाशानें पार पाडून त्या देशास जगांतील राष्ट्रांत उच्च स्थान मिळवून दिलें. केमालपाशोचें उदाहरण अनेक देशांस स्फूर्तिदायक झालेलें आहे.

---

## तांदूळ

जगांतील तांदळाखालील एकूण क्षेत्रफळापैकीं निम्म्यापेक्षा अधिक जमीन हिंदुस्थान आणि चीन ह्या देशांमध्यें आहे. हिंदुस्थानामध्यें चीनपेक्षा जास्त जमिनींत तांदळाची लागवड होते परंतु चीनमध्यें तांदळाचें उत्पादन सर्व देशांपेक्षा अधिक होतें. ब्रह्मदेशांतून सर्वांत अधिक तांदळाची निर्गत होते. व्यापारी पीक ह्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय देवघेवींत गहूं आणि मका ह्यांचे खालोखाल तांदळाचा अनुक्रम लागतो. दरसाल सुमारें ७५ लक्ष टन तांदळाची आयात-निर्गत होते. युरोपांतील देशांत गव्हाची आयात होते, तर आशियांतील देश तांदळाची आयात करतात. निर्गत करणाऱ्या देशांमध्यें ब्रह्मदेश, इंडोचायना, सयाम, कोरिया आणि फोर्मोसा हे प्रमुख आहेत. एकट्या ब्रह्मदेशांतून प्रतिवर्षी २० लक्ष टन तांदूळ बाहेर जातो, त्यापैकीं निम्मा तांदूळ हिंदुस्थानांत खपतो. तांदळाच्या व्यापारावरच ब्रह्मदेशाचें जीवित अवलंबून आहे. जपान, हिंदुस्थान, चीन, सिलोन, ब्रिटिश मलाया आणि नेदरलंड्स ईस्ट इंडीज ह्या सर्व देशांत तांदूळ होतो.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११६–१२ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०२–१२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—८ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८–८½ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०५—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९९–१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षें मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११९—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०—२ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८१—४ |
| यांबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११५—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२३—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १६४—६ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३४०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४५०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०३—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९३८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७२६—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १८६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४२—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—१ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८–१० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०६—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १५९–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | ३१८—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १५३०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | १११—८ |

### श्री. बालसमुद्रम् ह्यांची सहकारी संस्थांस भेट

मुंबई इलाख्यांतील कांहीं प्रसिद्ध व विशिष्ट प्रकारच्या निरनिराळ्या सहकारी संस्था मुद्दाम पहाण्यासाठीं मद्रास इलाख्यांतील कोइमतूर भागाचे असि. रजिस्ट्रार श्री. बालसमुद्रम् हे नुकतेच १७ ऑक्टोबर रोजीं कऱ्हाड येथील लँड मॉर्गेज बँक पहाण्यास असि. रजिस्ट्रार पुणें यांजबरोबर आले होते. त्यांस कोल्हापूर शहरांतील प्रसिद्ध सहकारी संस्था पाहणेंबद्दल श्री. राजाज्ञा यांनीं विनंति केल्यावरून हे उभयता अधिकारी तेथील शाहूपुरींत वारणा व्हॅली सेल युनियनचें आडत दुकान पाहणेस गेले. तेथून ते ३॥ वाजतां शिवाजी पेठेंतील श्रीबलभीम सोसायटीचे इमारतींत गेले. तेथें श्री. शिर्के फातरफेकर, रजिस्ट्रार, इ. करवीर यांनीं सोसायटीचे सभागृहांत जमलेल्या निरनिराळ्या पंधरासोळा सोसायट्यांच्या अध्यक्षांची पाहुण्यांस ओळख करून देऊन निरनिराळ्या प्रकारच्या सोसायट्या किती आहेत, त्यांचें भांडवल किती आहे, याची माहिती दिली.

श्री. ए. डी. बालसमुद्रम् हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

"मुंबई इलाख्यांतील सहकारी संस्था आम्हीं नुकत्याच पाहून आलों आहों. सुरत येथें कापूसविक्रीच्या सहकारी संस्था निवळ शेतकऱ्यांनीं चालविल्या असून, हंगामांत निरनिराळ्या वेळीं जरी किंमतीचा कमजास्त दर असतो तरी सर्व दरांची सरासरी करून शेतकऱ्यांस पैसा मिळतो. तेथें सोसायटीचे सभासदांस व्याजाचा दर दोन वर्षांपूर्वी ७॥८ होता तो हल्लीं सरसकट ६॥४ आहे. येथें मध्यवर्ती बँका तसेच सोसायट्या यांना ठेवी ३ ते ४॥ दरानें मिळतात. याचा फायदा सरसकट सर्व सोसायट्यांना होऊन व्याजाचा दर ६॥४ पर्यंत उतरला आहे व याप्रमाणें तो इलाखाभर व्हावयास पाहिजे. मुंबई इलाख्यांत शेतकी सोसायट्या दरसाल वार्षिक सभेंत अंदाजपत्रक मंजूर करतात. त्याप्रमाणें पंच कमेटी कर्ज देते. यामुळें येथें मेंबरांस वेळचे वेळीं निःपक्षपातीपणें कर्ज मिळतें. अहमदाबाद वगैरे मोठ्या शहरीं हौसिंग सोसायट्यांचा फारच प्रसार होऊन मध्यम वर्गास आरोग्यकारक घरें स्वतःच्या मालकीचीं राहणेस मिळूं लागलीं आहेत, एवढेंच नव्हे तर हरिजनांकरितां मालकीचीं घरें मिळून देणेची तजवीज सुरू झाली आहे. याखेरीज पिकांचें रक्षण व शेतकऱ्यांच्या नाशवंत मालाची विक्रीची सोय या इलाख्यांत झाली आहे, या माहितीचा आम्हांस पुष्कळ फायदा होणार आहे." यानंतर श्री. प्रभु, असि. रजिस्ट्रार, मध्यभाग, पुणें यांनीं सांगितलें:—"कर्ज देतेवेळीं कर्जदाराची कर्ज परत देणेची पात्रता कसोशीनें पाहिलेखेरीज कर्ज देऊं नये. प्रथम ही गोष्ट कष्टदायक वाटेल परंतु सोसायटीस लवाद दावे टाळणेचा हाच मार्ग आहे. सभासदांचें नैतिक वर्तन चांगलें असावें."

---

### पाण्याची वाटणी

तुंगभद्रा नदीच्या पाण्याचे वाटणीविषयीं मद्रास, म्हैसूर आणि हैद्राबाद सरकारांमध्यें तंटा आहे. तुंगभद्रेच्या निम्म्या पाण्यावर हैद्राबाद संस्थान हक्क सांगत असून उरलेलें निम्मे पाणी म्हैसूर आणि मद्रासनें वाटून घ्यावें असें त्यांचें म्हणणें आहे. ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं तिन्ही सरकारांच्या प्रतिनिधींची परिषद् गेल्या आठवड्यांत मद्रास येथें भरली होती. पाण्याचा वाटणीचा समाधानकारक निकाल लागला म्हणजे नियोजित धरणाचें काम हातीं घेतलें जाईल.

अप-टु-डेट शिलाई करतां

# महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें ] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

# पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**पाहिजेत !** खालील सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां **महाराष्ट्रांत व कर्नाटकांत** कांहीं ऑर्गनायझर व एजन्टस् पगारी कमिशनवर नेमणे आहेत.

# दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

## ( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा

चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डि. नं. ६ )
२५३१३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें

**द. म. द. शें. ४चार आणे व्याजानें**

**व**

**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**

देण्याची नवीन योजना. **लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा.** त्वरा करा आणि प्रॉस्पेक्ट्स व एजन्सीसाठीं ०२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

**हेड ऑफिसः**-गिरगांव, मुंबई. **ब्रँचः**-लक्ष्मी रोड, पुणें नं. २

# ☞फर्म. कंपनी आणि सोसायटी

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं सातारचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला " **न्यायबोध** " या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रांतिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा.व. ट.ख. सह फक्त ५ रु. नमुना अंकासाठीं सात आण्यांचीं तिकीटें पाठवा.

मॅनेजर,

" **न्यायबोध** " **मासिक, नागपुर शहर.**

**व्हीं. व्हीं. ॲन्ड को०**

जंपर स्पेशालिस्ट

**लेडीज ॲन्ड जेन्टस टेलर्स,**

८ निहाल पेठ (मुदलीयार रोड), पुणें शहर

# K. K. & Co,

**Photographic Dealers**

**POONA.**


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.